# प रि प त्र क

**विषय : सन २०१५-१६ साठी विविध केंद्र/राज्य पुरस्कृत योजनांतर्गत पुरवठा करावयाच्या जैविकखते, सूक्ष्ममूलद्रव्य, सल्फर ९० टक्के (पावडर) व सल्फर ८० टक्के (डबल्युडिजी), फॉस्फो जिप्सम व जिप्सम चे दर निश्चित करणेबाबत.**

**संदर्भ :** दिनांक : १० जुन२०१५ रोजी आयोजित निविष्ठा विक्रीदर निश्चिती समितीची सभा.

सन २०१५-१६ मध्ये कृषि विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध केंद्र व राज्य पुरस्कत योजना अंतर्गत शेतक-यांना पुरवठा करावयाच्या निविष्ठांचे दर निश्चित करण्यासाठी दिनांक १० जुन २०१५ रोजी सभा संपन्न झाली. सदर सभेत सन २०१५-१६ साठी जैविक खते, सूक्ष्ममूलद्रव्य, फॉस्फोजिप्सम, जिप्सम, सल्फर ९० टक्के (पावडर) व सल्फर ८० टक्के (डबल्युडिजी) चे दर निश्चित करण्यात आले असून त्याचा सविस्तर तपशिल खालील प्रमाणे आहे.

## १.जैविक खते :

| अ.क्र. | जैविक खताचे नांव (घनरुप) | परिमाण (पॅकिंग साईजनिहाय दर रुपये सर्व करासहीत तालुका स्तरावर पोहोच) | | |
|---|---|---|---|---|
| | | २५० ग्रॅम | ५०० ग्रॅम | १००० ग्रॅम |
| १ | पीएसबी | ११.०० | २१.०० | ४२.०० |
| २ | ॲझोटोबॅक्टर | ११.०० | २१.०० | ४२.०० |
| ३ | रायझोबियम | ११.०० | २१.०० | ४२.०० |
| ४ | ॲझोस्पिरिलम | ११.०० | २१.०० | ४२.०० |
| ५ | ॲसिटोबॅक्टर | ११.०० | २१.०० | ४२.०० |
| ६ | मायकोरायझा | ४०.०० | ५०.०० | ८०.०० |

| अ.क्र. | जैविक खताचे नांव (द्रवरुप) | परिमाण (पॅकिंग साईजनिहाय दर रुपये सर्व करासहीत तालुका स्तरावर पोहोच) | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | २५० मि.लि. | ५०० मि.लि. | १००० मि.लि. | ५००० मि.लि. |
| १ | पीएसबी | ४०.०० | ७३.०० | १३०.०० | ५०७.०० |
| २ | ॲझोटोबॅक्टर | ४०.०० | ७३.०० | १३०.०० | ५०७.०० |
| ३ | रायझोबियम | ४०.०० | ७३.०० | १३०.०० | ५०७.०० |
| ४ | ॲसिटोबॅक्टर | ४०.०० | ७३.०० | १३०.०० | ५०७.०० |
| ५ | ॲझोस्पिरिलम | ४४.०० | ८०.०० | १४३.०० | ५००.०० |

## २. सूक्ष्ममूलद्रव्ये:

| अ.क्र. | सूक्ष्ममूलद्रव्य खताचे नाव | पॅकींग साईज (किग्रॅ) | व्हॅटसह तालुका स्तरावर पोहोच दर (रुपये) |
|---|---|---|---|
| १ | झिंक सल्फेट | १ | ४४.०० |
| | | ४ | १७०.०० |
| | | ५ | २००.०० |
| | | ८ | ३३०.०० |
| | | १० | ४००.०० |
| | | १५ | ६००.०० |
| | | २० | ८००.०० |
| २ | फेरस सल्फेट | १ | १८.०० |
| | | ४ | ६९.०० |
| | | ५ | ८३.०० |
| | | ८ | १३४.०० |
| | | १० | १६५.०० |
| | | १५ | २४७.०० |
| | | २० | ३२९.०० |
| ३ | कॉपर सल्फेट | १ | १७४.०० |
| | | ५ | ८१६.०० |
| | | १० | १५७०.०० |
| ४ | मॅग्नेशियम सल्फेट | १ | १६.०० |
| | | ५ | ७९.०० |
| | | १० | १५८.०० |
| ५ | मॅगेनिज सल्फेट | १ | ४९.०० |
| | | ५ | २३३.०० |
| | | १० | ४६५.०० |
| ६ | बोरॉन १०.५० टक्के | १ | ६५.०० |
| | | ५ | ३२५.०० |
| | | १० | ६५०.०० |
| ७ | बोरॉन २० टक्के | १ | ३७०.०० |
| | | ५ | १७५०.०० |
| | | १० | ३५३५.०० |
| ८ | सूक्ष्ममूलद्रव्य ग्रेड - १ पावडर | १ | ४८.०० |
| | | ५ | २२५.०० |
| | | १० | ४४०.०० |
| ९ | सूक्ष्ममूलद्रव्य ग्रेड - २ पावडर | १ | ४८.०० |
| | | ५ | २२५.०० |
| | | १० | ४४०.०० |
| १० | सूक्ष्ममूलद्रव्य ग्रेड - २ द्रवरुप | १ | १४५.०० |
| | | ५ | ६००.०० |
| | | १० | १२००.०० |
| ११ | सल्फर ९० टक्के (पावडर) | १ | १००.०० |
| | | ३ | २८०.०० |
| | | ५ | ४९०.०० |
| | | १० | ९७०.०० |
| १३ | सल्फर ८०टक्के (डब्ल्युडिजी) | १ | १००.०० |
| | | ३ | २८०.०० |
| | | ५ | ४९०.०० |
| | | १० | ९७०.०० |

## ३. फॉस्फोजिप्सम :

(दर रू. प्रति मे.टन)

| अ.क्र. | जिल्हा | सन २०१५-१६ करीता फॉस्फो जिप्समचे वाहतूक व सर्व करासहीत मंजूर दर | | | अ.क्र. | जिल्हा | सन २०१५-१६ करीता फॉस्फो जिप्समचे वाहतूक व सर्व करासहीत मंजूर दर | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुळ किंमत | वाहतूक खर्च | एकूण किंमत | | | मुळ किंमत | वाहतूक खर्च | एकूण किंमत |
| १ | ठाणे | ९५० | १९४५ | २८९५ | १८ | लातूर | १००० | २३०० | ३३०० |
| २ | रायगड | ९५० | २००० | २९५० | १९ | उस्मानाबाद | १००० | २३०० | ३३०० |
| ३ | रत्नागिरी | ९५० | २५०० | ३४५० | २० | नांदेड | १००० | २२०० | ३२०० |
| ४ | सिंधुदुर्ग | ९५० | २६०० | ३५५० | २१ | परभणी | १००० | २१५० | ३१५० |
| ५ | नाशिक | ९५० | १५८० | २५३० | २२ | हिंगोली | १००० | २२०० | ३२०० |
| ६ | धुळे | १००० | १६०० | २६०० | २३ | बुलढाणा | ९५० | २३५३ | ३३०३ |
| ७ | नंदुरबार | १००० | १५५० | २५५० | २४ | अकोला | १००० | २१०० | ३१०० |
| ८ | जळगांव | १००० | १७५० | २७५० | २५ | वाशिम | १००० | २३०० | ३३०० |
| ९ | अहमदनगर | ९५० | १८७५ | २८२५ | २६ | अमरावती | १००० | २४०० | ३४०० |
| १० | पुणे | ९५० | १९०० | २८५० | २७ | यवतमाळ | १००० | २४५० | ३४५० |
| ११ | सोलापूर | ९५० | २१२३ | ३०७३ | २८ | वर्धा | १००० | २३०० | ३३०० |
| १२ | सातारा | ९५० | २१०० | ३०५० | २९ | नागपूर | १००० | २५०० | ३५०० |
| १३ | सांगली | ९५० | २२५० | ३२०० | ३० | भंडारा | ९५० | ३३५५ | ४३०५ |
| १४ | कोल्हापूर | ९५० | २३५३ | ३३०३ | ३१ | गोंदिया | ९५० | ३५६५ | ४५१५ |
| १५ | औरंगाबाद | १००० | २००० | ३००० | ३२ | चंद्रपूर | ९५० | ३१५८ | ४१०८ |
| १६ | जालना | १००० | २०५० | ३०५० | ३३ | गडचिरोली | ९५० | ३७७५ | ४७२५ |
| १७ | बीड | १००० | २१५० | ३१५० | | | | | |

## ४. जिप्सम :

(दर रू. प्रति मे.टन)

| अ.क्र. | जिल्हा | सन २०१५-१६ करीता जिप्समचे वाहतूक व सर्व करासहीत मंजूर दर | | | अ.क्र. | जिल्हा | सन २०१५-१६ करीता जिप्समचे वाहतूक व सर्व करासहीत मंजूर दर | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | मुळ किंमत | वाहतूक खर्च | एकूण किंमत | | | मुळ किंमत | वाहतूक खर्च | एकूण किंमत |
| १ | ठाणे | ११५० | ६२५० | ७४०० | १८ | लातूर | ११५० | ६३१६ | ७४६६ |
| २ | रायगड | ११५० | ६७५० | ७९०० | १९ | उस्मानाबाद | ११५० | ६३१६ | ७४६६ |
| ३ | रत्नागिरी | ११५० | ७२५० | ८४०० | २० | नांदेड | ११५० | ६३१६ | ७४६६ |
| ४ | सिंधुदुर्ग | ११५० | ७२५० | ८४०० | २१ | परभणी | ११५० | ६३१६ | ७४६६ |
| ५ | नाशिक | ११५० | ५०८७ | ६२३७ | २२ | हिंगोली | ११५० | ६३१६ | ७४६६ |
| ६ | धुळे | ११५० | ५०८७ | ६२३७ | २३ | बुलढाणा | ११५० | ५८४४ | ६९९४ |
| ७ | नंदुरबार | ११५० | ५०८७ | ६२३७ | २४ | अकोला | ११५० | ६०३३ | ७१८३ |
| ८ | जळगांव | ११५० | ५१८२ | ६३३२ | २५ | वाशिम | ११५० | ६०३२ | ७१८२ |
| ९ | अहमदनगर | ११५० | ५८४३ | ६९९३ | २६ | अमरावती | ११५० | ६०३३ | ७१८३ |
| १० | पुणे | ११५० | ६०३२ | ७१८२ | २७ | यवतमाळ | ११५० | ६१२७ | ७२७७ |
| ११ | सोलापूर | ११५० | ६३१६ | ७४६६ | २८ | वर्धा | ११५० | ६५०५ | ७६५५ |
| १२ | सातारा | ११५० | ६२२१ | ७३७१ | २९ | नागपूर | ११५० | ६५०५ | ७६५५ |
| १३ | सांगली | ११५० | ६३१६ | ७४६६ | ३० | भंडारा | ११५० | ६९७७ | ८१२७ |
| १४ | कोल्हापूर | ११५० | ६३१६ | ७४६६ | ३१ | गोंदिया | ११५० | ६९७७ | ८१२७ |
| १५ | औरंगाबाद | ११५० | ५५६० | ६७१० | ३२ | चंद्रपूर | ११५० | ६९७७ | ८१२७ |
| १६ | जालना | ११५० | ५८४३ | ६९९३ | ३३ | गडचिरोली | ११५० | ७४५० | ८६०० |
| १७ | बीड | ११५० | ६०३२ | ७१८२ | | | | | |

वरील विक्री दर हे सर्व करासहित तालुका स्तरापर्यंत पोहोच तत्वावर निश्चित करण्यात आले आहेत.

जैविक खते, सूक्ष्ममूलद्रव्य, सल्फर ९० टक्के पावडर, सल्फर ८० टक्के डब्ल्यूडीजी, फॉस्फो जिप्सम व जिप्समचा पुरवठा हा महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचेकडून करुन घ्यावयाचा आहे. पुरवठा करतांनास निविदा प्रक्रियेमध्ये सहभागी झालेल्या उत्पादकांच्या प्रस्तावाची तांत्रिक छाननी व पडताळणी पूर्ण करण्याची जबाबदारी पूर्णपणे शासन नियुक्त पुरवठा संस्थेची राहील. उत्पादकांना पुरवठा आदेश देण्यापूर्वी त्यांचे कडील परवाना क्रमांक व वैधता तपासून घेवून उत्पादकांचे परवाना सर्व दृष्टीने वैध असल्याची खात्री केल्यानंतरच पुरवठाआदेश द्यावेत.

पुरवठादार संस्थेने पुरवठा करणा-या जैविक खते, सूक्ष्ममूलद्रव्य, सल्फर ९० टक्के पावडर, सल्फर ८० टक्के डब्ल्यूडीजी व फॉस्फो जिप्सम उत्पादकांकडे खत नियंत्रण आदेश १९८५ मधील तरतुदीनुसार परवाना प्राधिकारी , कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडून उत्पादन व विक्री परवाना घेतला असल्याची खात्री करावी.

**अ) सूक्ष्ममूलद्रव्ये :**

कृषि विभागाच्या विविध योजनांतर्गत सूक्ष्ममूलद्रव्ये, पुरवठ्यासाठी कृषि आयुक्तालयातील योजना राबविणाऱ्या संबंधित कक्ष/ विभागाने त्यांच्या स्तरावरुन योजना व त्यातील घटक राबविण्याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित कराव्यात.

१. प्रत्येक तालुक्यात पुरवठा केल्या जाणाऱ्या प्रत्येक बॅचचे तालुकानिहाय रॅण्डम पध्दतीने संबंधित खत निरिक्षकाने खत नियंत्रण आदेश १९८५ मधील तरतूदीनुसार त्वरीत नमुने घेऊन त्याची तपासणी शासकीय खत चाचणी प्रयोगशाळाद्वारे करावी. विश्लेषण अहवाल प्राप्त करुन देण्यास १० दिवसापेक्षा जास्त कालावधी लागणार नाही, याची दक्षता खत चाचणी प्रयोगशाळांनी घ्यावी. विश्लेषणांतर्गत ज्या तालुक्यात ज्या बॅचचा नमुना अप्रमाणित घोषित होईल त्या बॅचची देयके आदा न करण्याची दक्षता संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, कृषि विकास अधिकारी जिल्हा परिषद, उपविभागीय कृषि अधिकारी व तालुका कृषि अधिकारी यांनी घ्यावी. ती त्यांची वैयक्तिक जबाबदारी राहील. तसेच अशा नमुन्याबाबत खत नियंत्रण आदेश १९८५ मधील तरतूदी नुसार कार्यवाही करावी.

२. योजनांतर्गत राज्य/केंद्र शासनाने सूक्ष्ममूलद्रव्याच्या पुरवठ्याबाबत काही धोरणात्मक बदल केल्यास त्याबाबत सर्व संबंधितांना अवगत करण्याची जबाबदारी विस्तार व प्रशिक्षण, फलोत्पादन इत्यादी योजना राबविणाऱ्या संबंधित विभागाची राहील.

३. सल्फर ९० टक्के पावडर व सल्फर ८० टक्के डब्ल्यूडीजी ची क्षेत्रीय अधिकाऱ्यांनी मागणी करतांना व पुरवठादार संस्थेने पुरवठा करतांना ते खत नियंत्रण आदेश १९८५ मधील मानकानुसार आहे, याची खात्री करावी.

**ब) जैविक खते :**

तसेच कृषि विभागाच्या विविध योजनांतर्गत जैविक खत पुरवठ्यासाठी कृषि आयुक्तालयातील योजना राबविणाऱ्या संबंधित कक्ष/ विभागाने त्यांच्या स्तरावरुन योजना व त्यातील घटक राबविण्याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित कराव्यात.

१. कृषि विभागाच्या वैध निर्मिती/ विक्री प्राधिकारपत्र धारक प्रयोगशाळा, राज्यातील ४ कृषि विद्यापीठे व शासनाने मान्यता दिलेली कृषि विज्ञान केंद्रे यांचेमार्फत उत्पादित जैविक खते वरील दराने प्रथम प्राधान्याने खरेदी करावी, त्यांचे कडील संपूर्ण विक्री झाल्यानंतरच त्यांचे ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करुन एमअेआयडीसी यांचे कडे मागणी नोंदवावी.

२. जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांनी अनुक्रमे कृषि विभागामार्फत राबविल्या जाणा-या योजना व जिल्हा परिषदेमार्फत राबविल्या जाणा-या योजनेंतर्गत निविष्ठांची गरज निश्चित करुन विभागीय कृषि सहसंचालक यांचे समन्वयाने पुरवठा आदेश पुरवठादार संस्थेकडे तात्काळ द्यावेत. जैविक खताची मागणी व पुरवठा आदेश आवश्यकतेप्रमाणेच देण्यात यावेत. जेणेकरुन साठा कालबाह्य होणार नाही. आदेश देतांना शक्यतो जैविक द्रवरुप खतांचे सेल्फलाईफ जास्त असल्याने या खतांना प्राधान्य दयावे. तसेच पुरवठा आदेशाच्या प्रती संबंधित योजना राबविणाऱ्या संचालकांना सादर कराव्यात.

३. पुरवठा आदेश दिल्यापासून पंधरा दिवसात जैविक खतांचा पुरवठा करणे पुरवठादार संस्थेवर बंधनकारक राहील.

४. पुरवठा आदेश देतांना केवळ तांत्रिक नावानेच पुरवठा आदेश द्यावा, ब्रँडच्या नावाचा आग्रह करु नये.

५.वाहतूक व साठवणूक करतांना योग्य तापमानात वाहतूक व साठवणूक तसेच ठराविक कालावधीत वाहतूक करणेबाबत पुरवठादार संस्थेने योग्य ती दक्षता घ्यावी.

६. प्रत्येक तालुक्यात पुरवठा केल्या जाणाऱ्या प्रत्येक बॅचचे तालुकानिहाय रॅण्डम पध्दतीने त्या तालुक्यातील खत निरिक्षकाने खत नियंत्रण आदेश १९८५ मधील तरतुदीनुसार त्वरीत नमुने घेऊन त्याची तपासणी शासकीय खत चाचणी प्रयोगशाळांद्वारे करावी. विश्लेषण अहवाल प्राप्त करुन देण्यास १० दिवसापेक्षा जास्त कालावधी लागणार नाही याची दक्षता खत चाचणी प्रयोगशाळांनी घ्यावी. विश्लेषणांतर्गत ज्या तालुक्यात ज्या बॅचचा नमुना अप्रमाणीत घोषित होईल त्या बॅचची त्या तालुक्याची देयके आदा न करण्याची दक्षता संबंधित जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, उपविभागीय कृषि अधिकारी व तालुका कृषि अधिकारी यांनी घ्यावी. ती त्यांची वैयक्तिक जबाबदारी राहील. तसेच अप्रमाणीत नमुन्याबाबत खत नियंत्रण आदेश १९८५ मधील तरतूदीनुसार कार्यवाही कारावी. याबाबत सनियंत्रणाची जबाबदारी जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी व कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद यांची राहील.

७. पुरवठा होणाऱ्या जैविक खताच्या बॅगवर खत नियंत्रण आदेश १९८५ मधील परिशिष्ट ३ भाग- ड (४.२) नुसार बॅगेवर लिहावयाचा मजकुर छापणे बंधनकारक राहील.

८.पुरवठादार संस्थेने निश्चित केलेल्या उत्पादक/ पुरवठादारांनी उत्पादन स्थळी उत्पादनाबाबतचे सर्व अभिलेख ठेवणे बंधनकारक आहे. तसेच प्रत्येक बॅचचा नमुना उत्पादन स्थळी तपासून त्याचे अभिलेख व काऊंटर सॅम्पल जतन करुन ठेवणे आवश्यक आहे.तसेच तपासणीच्या वेळी तपासणी अधिका-यास उपलब्धकरुन द्यावेत.

९.जैविक खत उत्पादकांनी जैविक खतांचे उत्पादन करताना आवश्यकतेनुसार नविन मदर कल्चर वापरावे, जुन्या मदर कल्चरचा वापर करु नये.

१०.पुरवठादार संस्थेने पुरवठयाची देयके योजना राबविणाऱ्या संबंधित कार्यालयास विहित नमुन्यात व वेळेवर द्यावीत. त्यामध्ये उत्पादनाचा बॅच क्रमांक, उत्पादन तारीख, पुरविलेली मात्रा प्रति युनिट दर व देयकाची रक्कम याचा तपशिल असावा.

११.योजनांतर्गत राज्य/केंद्र शासनाने जैविक खतांच्या पुरवठ्याबाबत काही धोरणात्मक बदल केल्यास त्याबाबत सर्व संबंधितांना अवगत करण्याची जबाबदारी विस्तार व प्रशिक्षण, फलोत्पादन इत्यादी योजना राबविणा-या संबंधित विभागाची राहील.

१२.जैविक खताचे उत्पादन व गुणवत्ता खत नियंत्रण आदेश १९८५ च्या परिशिष्ट ३ भाग अ च्या मानकाप्रमाणे राहील व त्याप्रमाणे उत्पादन व पुरवठा करण्याची जबाबदारी पुरवठादार संस्थांची राहील.

## क) फॉस्फोजिप्सम व जिप्सम :

कृषि विभागाच्या विविध योजनांतर्गत फॉस्फोजिप्सम व जिप्सम पुरवठ्यासाठी कृषि आयुक्तालयातील योजना राबविणाऱ्या संबंधित कक्ष/ विभागाने त्यांच्या स्तरावरुन योजना व त्यातील घटक राबविण्याबाबत सविस्तर मार्गदर्शक सूचना निर्गमित कराव्यात.

सदरचे विक्री दर हे ५० किलोच्या एचडीपीई बॅगमध्ये पॅकींग करुन वाहतुक करुन तालुकास्तरापर्यंत पोहच तत्वावर अंतीम करण्यात आलेले आहेत.योजनांतर्गत जिल्हानिहाय खरेदी करावयाच्या फॉस्फोजिप्सम व जिप्समची मागणी, पोहोच करण्याची ठिकाणे, संपर्क अधिकारी/ कर्मचारी व इतर अनुषंगीक माहिती कृषि आयुक्तालयातील योजना राबविणाऱ्या संबंधीत कक्ष/ विभागाने त्यांचे स्तरावरुन महाराष्ट्र कृषि उद्योग विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांना उपलब्ध करुन द्यावी.

**फॉस्फोजिप्सम व जिप्समचा पुरवठा करतांना खालील प्रमाणे दक्षता घेणेत यावी.**

१. फॉस्फोजिप्सम व जिप्सम हे सॉइल ॲप्लिकेशनसाठी असून त्याच्या वापराबाबत सर्व संबंधितांना आवश्यक तांत्रीक माहिती देण्याची संपूर्ण दक्षता पुरवठ्याचे आदेश देणाऱ्या अधिकाऱ्यांनी घ्यावी. पुरवठा स्वीकारताना दिलेल्या आदेशाप्रमाणे फॉस्फोजिप्सम व जिप्समच्या उगम प्रमाणपत्राची व खरेदी देयकाची मागणी करावी. पुरवठा करावयाचे फॉस्फोजिप्सम हे खत नियंत्रण आदेश १९८५ मधील मानकानुसार असणे आवश्यक आहे. जिप्सम हे भारतीय मानक IS : ६०४६ - १९८२ प्रमाणे असणे आवश्यक आहे, याची पुरवठा करणाऱ्या यंत्रणांनी खात्री करुनच पुरवठा करावा.

२. तालुका स्तरावर विविध योजनांतर्गत फॉस्फोजिप्सम व जिप्समचा पुरवठा करण्यांत आलेनंतर तेथील खतनिरीक्षकांनी प्रत्यक्ष झालेल्या पुरवठा साठ्यातून फॉस्फोजिप्सम व जिप्समचे नमुने काढावेत व अनुक्रमे शासकीय खत नियंत्रण प्रयोगशाळा व मृद चाचणी प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवावेत. फॉस्फो जिप्समचे नमुने अप्रमाणीत आल्यास खत नियंत्रण आदेश १९८५ मधील तरतूदीनुसार कार्यवाही करावी.

३. फॉस्फोजिप्सम व जिप्समची तपासणी संबंधित प्रयोगशाळांनी अनुक्रमे खत नियंत्रण आदेश १९८५ व भारतीय मानक IS : ६०४६ - १९८२ मध्ये दिलेल्या विश्लेषण पद्धतीनुसार विश्लेषण करुन तसा अहवाल संबंधिताना द्यावा.

**जैविक खते, सूक्ष्ममूलद्रव्य, सल्फर ९० टक्के पावडर, सल्फर ८० टक्के डब्ल्यूडीजी, फॉस्फो जिप्सम व जिप्समचे नमुने अप्रमाणीत आल्यास अशा नमुन्यांच्या बाबत लोकवाटा/ वर्गणी शेतकऱ्यांकडून जमा केली असल्यास व ती पुरवठादार संस्थेकडे जमा केली नसल्यास संबंधित शेतकऱ्यांना परत करावी. लोकवाटा / वर्गणी पुवठादार संस्थेकडे जमा केली असल्यास ती पुरवठादार संस्थेच्या देयकातून वजा करुन संबंधीत शेतकऱ्यांना परत करावी. वाटप केलेल्या निविष्ठांची शेतकरीनिहाय नोंद ठेवावी.**

वरीलप्रमाणे सूचना व संबंधित योजना राबविणा-या कक्षाकडील सविस्तर मार्गदर्शक सूचना जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी यांनी त्यांचे स्तरावरुन अधिनस्त कार्यालयांना पाठवाव्यात. तसेच योजनांतर्गत मार्गदर्शक सूचनाबाबत क्षेत्रीय स्तरावरील अधिकाऱ्यांना/ कर्मचाऱ्यांना काही अडचणी असल्यास त्याबाबत संबंधित कक्षाशी संपर्क साधावा.

**कृषि संचालक, (निवगुनि)**
**कृषि आयुक्तालय, म. रा. पुणे-१**

---

जा.क्र.राखते/गुनि३-४/जै.खते दर/ २७८ /१५
कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य,
पुणे -४११ ००१, दिनांक : १० जुन २०१५

**प्रति,**

१. **मा. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र कृषि उदयोग विकास महामंडळ, कृषि भवन, दिनकरराव देसाई मार्ग, आरे मिल्क कॉलनी, गोरेगांव पुर्व, मुंबई-६५**
२. **संचालक (विस्तार व प्रशिक्षण) कृषि आयुक्तालय, पुणे-५**
३. **संचालक (फलोत्पादन,) कृषि आयुक्तालय, पुणे-५**
४. **विभागीय कृषि सह संचालक, (सर्व)**
५. **मुख्य गुणवत्ता नियंत्रण अधिकारी, कृषि आयुक्तालय, म. रा. पुणे**
६. **जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी (सर्व)**- त्यांनी या परिपत्रकाच्या प्रती अधिनस्त सर्व उविकृअ/ताकृअ यांना त्यांच्या स्तरावरून द्याव्यात.
७. **कृषि विकास अधिकारी (सर्व)**

**प्रत - मा.अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मुंबई यांना माहितीसाठी सविनय सादर.**